Publication: Lokmat
Date: 1/9/2019
Page: 3
Column: 3

रविवार | लोकमत
दि. १ सप्टेंबर २०१९

# सवलतीच्या दरात तात्पुरती वीज जोडणी

3/3

अदानीतर्फे गणपती मंडपांसाठी सवलतीच्या दरात तात्पुरती वीज जोडणी दिली जाणार आहे. अर्ज कंपनीला मिळाल्यानंतर फक्त तीन दिवसांत ही जोडणी सुरु केली जाईल. २ हजार ५०० हून अधिक मंडपांना वीज जोडणी देण्यासाठी अदानीने नियोजन केले आहे. मंडपाजवळ सर्व परिस्थिती सुयोग्य असल्यास आणि सर्व नियमांचे अनुपालन केलेले असल्यास अर्ज मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत वीज जोडणी पुरवली जाईल. या सर्व मंडपांमध्ये सवलतीच्या दरात वीजपुरवठा केला जाईल.



मंडपांमध्ये अधिकृत जोडणी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपनगरातील कस्टमर केअर सेंटर्सना भेट देऊनही अर्ज करता येईल. मंडपांमध्ये येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गणेश मंडळांनी अधिकृत लायसन्स इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरकडूनच वीज जोडणी घ्यावी, अशी विनंती मंडळांना करण्यात आली आहे. दरम्यान, अदानीतर्फे विसर्जनाच्या ७४ ठिकाणांवर फ्लड लाइट्स आणि पर्यायी डिझेल जनरेटरच्या माध्यमातून तात्पुरती प्रकाशयोजनाही केली जाणार आहे.